डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व सलंग्न संस्थेतील सुधारीत वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना दि. ०१/०१/२०१४ ते ३०/०४/२०१४ या कालावधीची महागाई भत्ता थकबाकी देण्याबाबत.

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

## अर्थप्रशासन विभाग

वाचा : १) या विभागाचे परिपत्रक क्र.अप्रवि/मभवा/निमवा/२०१४-१५/२४०, दि.२०/०५/२०१४.
२) शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक : मभवा-१११४/प्र.क्र.१२/ सेवा-९, दि.२०/०९/ २०१४.
३) शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक : निमवा-२०१४/प्र.क्र.५७/ सेवा-४, दि.२२/०९/२०१४.

### आदेश

क्र.अप्रवि/मभवा/निमवा/२०१४-१५/ १२०४ दिनांकः २३/०९/२०१४

उपरोक्त **परिपत्रक क्र १.** नुसार २० मे, २०१४ पासुन **मुळ वेतन अधिक ग्रेड वेतन / निवृत्ती वेतन/कूटूंब निवृत्ती वेतन** यांच्या एकूण रकमेवर दिनांक १ मे, २०१४ पासुन १०% दराने महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे म्हणजेच सध्याच्या ९० % महागाई भत्या ऐवजी वरीलप्रमाणे वेतनाच्या/निवृत्ती वेतनाच्या/कूटूंब निवृत्ती वेतनाच्या १०० % महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्न अनुदानित संस्थातील कर्मचा-यांना व निवृत्ती वेतन धारकांना दिनांक १ मे, २०१४ पासुन उपरोक्त महागाई भत्याची वाढ लागु करण्यात आलेली आहे. **आता उपरोक्त शासन निर्णयान्वये माहे जानेवारी,२०१४ ते एप्रिल, २०१४ या कालावधीची महागाई भत्ता वाढीची थकबाकी रक्कम रोखीने देण्यात यावी.**

सदरहू महागाई भत्याची थकबाकी **माहे सप्टेंबर-२०१४ चे नियमित वेतन, निवृत्ती वेतन देयकात रोखीने अदा करावी. किंवा त्यापुढील नियमित मासिक वेतन देयकात समावेश करावा** मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पूरवणी देयके पारित केली जाणार नाहीत.

महागाई भत्ता वाढीच्या **थकबाकी** अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन २०१४-१५ चे मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

भाकृअप योजनातंर्गत २०१४-१५ करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वियन अधिका-यांनी प्रस्तुत महागाई भता थकबाकी विचारात घेवून त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी. व्दितीय सहामाही करीता अनुदानाची मागणी यापुर्वी केलेली असल्यास महागाई भत्याच्या थकबाकी तरतुदीसाठी स्वतंत्र वाढीव मागणीचा प्रस्ताव संबंधित कार्यान्वियन अधिका-यांनी भाकृअपस त्वरीत सादर करावा.

**नियंत्रक**
**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,**
**अकोला**

**प्रति:१)** नियंत्रण अधिकारी(सर्व)/आहरण व संवितरण अधिकारी(सर्व)/विभागप्रमुख(सर्व).

2)प्राचार्य

3)अधिदान व लेखा अधिकारी, डॉ.पंदेकृवि, अकोला/नागपुर.
यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन धारकांना **१ जानेवारी,२०१४ ते ३० एप्रिल, २०१४** या कालावधीची महागाई भत्ता थकबाकी रक्कम रोखीने माहे **सप्टेंबर-२०१४ देय ऑक्टोंबर-२०१४** चे नियमित मासिक निवृत्ती वेतन देयकात प्रदान करणेत यावी. महागाई भत्ता अदा करण्यासाठी निवृत्ती वेतन अथवा वेतनाचे स्वतंत्र पुरवणी देयके आपण पारित करु नये.

**नियंत्रक**

E:\DA.doc